**सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे 411001**

**Pro-active Disclosure under**

**Section 4(1) (b) of the Right To Information Act 2005**

## 1. The particulars of organisation, functions and duties

## (रचना, कार्ये व कर्तव्ये यांचा तपशील)

- सहकारी अर्थ व्यवस्था ग्रामीण जनता, आर्थिक व सामाजिक पीडित शोषितांच्या उत्कर्षाचे आशा स्थान म्हणून मान्यता पावलेली असून तिने गेल्या शतकामध्ये सर्व व्यापी स्वरूप प्राप्त केलेले आहे. व्यक्तीच्या ग्रामीण शेती विषयक गरजांपासून ते ग्राहक वस्तू वितरण, औद्योगिक प्रक्रिया, इतकेच नव्हे तर सहकारी रुग्णालयांपर्यंत लक्षणीय वाटचाल झाली आहे.
- सहकारी संस्थांची संख्या सन 1961 मध्ये 31,565 होती व मार्च 2014 अखेर ती 2,30,295 इतकी झालेली आहे. सभासद संख्या सन 1961 मध्ये 42 लाख होती व मार्च 2014 अखेर ती अंदाजे 509 लाख इतकी झालेली आहे.
- या सहकारी संस्थांचे संचालन व प्रशासन सहकार खाते व त्या अंतर्गत असलेली दोन संचालनालये अनुक्रमे पणन संचालनालय, पुणे व हातमाग, यंत्रमाग व वस्त्रोद्योग संचालनालय, नागपूर आणि साखर आयुक्तालय, पुणे यांच्या मार्फत केले जाते.

- विभाग 1 - सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था, म.रा. पुणे यांच्या नियंत्रणाखालील विषय :-
    1. संचालन व प्रशासन
    2. लेखापरिक्षण
    3. सहकारी पत संस्था
    4. औद्योगिक सहकारी संस्था (हातमाग व यंत्रमाग व्यतिरिक्त)
    5. सहकारी गृहनिर्माण संस्था
    6. इतर सहकारी संस्था
    7. शिक्षण, संशाधन व प्रशिक्षण

➢ विभाग 2 - साखर आयुक्त महाराष्ट्र राज्य पुणे यांच्या नियंत्रणा - खालील विषय :-

1. सहकारी साखर कारखाने.

➢ विभाग 3 - संचालक कृषि पणन, म.रा. पुणे यांच्या नियंत्रणा खालील विषय:-

1. वखार
2. सहकारी प्रक्रिया संस्था
3. सहकारी पणन संस्था
4. सहकारी गोदामे
5. सहकारी ग्राहक संस्था
6. कृषि उत्पन्न बाजार समित्या
7. पणन सर्वेक्षण व संशोधन
8. एकसूत्री बाजार वृत्तसंस्था योजना.

वस्त्रोद्योग विभाग

प्रास्ताविक - मार्च 89 पासून पातळीवर कृषि व सहकार विभाग हयांचे विभाजन होऊन सहकार व वस्त्रोद्योग विभाग हा स्वंतत्र विभाग निर्माण करण्यात आला. या विभागात खालील कार्यालयांचे कामकाज अंतर्भूत करण्यात आले आहे.

➢ वस्त्रोद्योग संचालनालय, म.रा. नागपूर यांच्या नियंत्रणाखालील विषय:-

1. हातमाग व यंत्रमाग सहकारी संस्था
2. सहकारी सूतगिरण्या

➢ रेशीम संचालनालय, म.रा. नागपूर यांच्या नियंत्रणाखालील विषय:-

1. रेशीम उद्योग

**2. The powers and duties of officers and employees**

**(अधिकारी व कर्मचारी यांचे अधिकार व कर्तव्ये)**

सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे व त्यांचे अधिनस्त अधिकारी यांच्या जबाबदा-या

1. सहकारी संस्था नोंदणी, उपविधी नोंदणी करणे. (कलम 9)
2. सदस्य होऊ पाहणारा इसम शेतकरी आहे किंवा नाही, किंवा त्याचे रहाण्याचे ठिकाण संस्थेच्या कार्यक्षेत्रात आहे किंवा नाही याचा निर्णय देणे (कलम 11)
3. उपविधींची दुरुस्ती / सुधारणा करणे वा दुरुस्ती / सुधारणा नाकारणे (कलम 13) आणि उपविधी सुधारणा करण्याचा निर्देश देणे (कलम 14)
4. संस्थेच्या नांव बदलास मंजूरी देणे (कलम 15)
5. संस्थांचे एकीकरण, हस्तांतर, विभागणी किंवा रूपांतर यास मंजूरी देणे (कलम 17)
6. संस्थांचे एकीकरण किंवा पुनर्रचना करण्याचा निर्देश देणे (कलम 18)
7. संस्थेची पुनर्रचना करण्याचा आदेश देणे (कलम 19)
8. संस्थांच्या भागीदारीस परवानगी देणे (कलम 20)
9. संस्थेची नोंदणी रद्द करणे (कलम 21)
10. एखाद्या संस्थेचा सदस्य म्हणून दाखल करून घेण्यास नकार देण्यात आलेल्या व्यक्तीने केलेले अपील निकालात काढणे (कलम 23)
11. सदस्याची संस्थेतून हकालपट्टी करण्याचे ठरावास मान्यता देणे किंवा सदर सदस्यास पुनः सदस्य म्हणून दाखल करून घेण्यास संमती देणे (कलम 35)
12. एका सहकारी संस्थेने दुस-या सहकारी संस्थेस कर्ज देण्यास संमती देणे (कलम 44)
13. समितीने तिची निवडणूक घेण्यासंबंधात बुध्दी पुरस्सर कसूर केली असेल, तर आणि त्यामुळे कोणत्याही कारणास्तव, मुदत संपण्यापूर्वी समितीची निवडणूक घेता आली नसेल तर, समितीचे सदस्य त्यांचे अधिकारपद धारण करण्याचे बंद करतील व अशा परिस्थितीत कलम 77 अन्वये प्राधिकृत अधिकारी नियुक्ती करणे.
14. संस्थेचा किंवा संस्था वर्गाचा मुख्य कार्यकारी अधिकारी, वित्त अधिकारी, व्यवस्थापक, सचिव, लेखापाल व इतर कोणताही पदाधिकारी यांच्या नियुक्तीसाठी लागणा-या अर्हता आणि यांच्या वित्तलब्धी व वेतनेतर परिलब्धी निर्धारित करणे (कलम 74)
15. वार्षिक सर्व साधारण सभा बोलविण्यात किंवा तिचेपुढे ताळेबंद वगैरे ठेवण्याच्या बाबतीत कसून करणारा (कलम 75) किंवा विशेष साधारण सभा बोलाविण्यात कसूर करणारा (कलम 76) अधिकारी किंवा समितीचा सदस्य यांस निवडणुकीस अपात्र ठरविणे किंवा असा अधिकारी संस्थेचा नोकर असल्यास त्यास रु.5000/- पर्यंत दंड करणे.
16. वार्षिक सर्व साधारण सभा बोलाविण्याचा एखाद्या इसमास अधिकार देणे (कलम 75)
17. संस्थेची विशेष सर्व साधारण बोलविणे किंवा ती बोलविण्याचा एखाद्या इसमास अधिकार देणे (कलम 76)
18. समितीच्या सदस्यांची नियुक्ती, नवीन समिती, समितीची घटना करीत असते वेळी कोणताही सदस्य निवडून न येणे व नवीन समितीने पदभार न स्वीकारणे यावेळी प्राधिकृत अधिकाऱ्याची नियुक्ती करणे. (कलम 77)

19. समिती कर्तव्ये पार पाडण्यात कसूर करीत असेल, निष्काळजीपणा करीत असेल, तिचीकामे उचितरित्या व साक्षेपाने पार पाडीत नसेल वा सदस्यांचा राजीनामा निरर्हता यामुळे किंवा अन्यथा समितीच्या रचनेत किंवा कार्यात दोष असेल तर संचालक समिती निलंबित करुन प्रशासक किंवा प्रशासकांची समिती नेमणे. (कलम 78)
20. समिती सदस्याने संस्थेच्या हितास बाधा, कृती, निवडणूक घेण्यास कसूर वा समितीची कामे पार पाडणेस नाकारणे व थांबवणे, गंभीर वित्तीय बाबी, अफरातफरी वा न्यायिक निदेश गणपूर्ती होत नसेल तेथे समिती अथवा संचालक वा सदस्यास निष्प्रभावित करणे. (कलम 78क)
21. विवरण पत्रे दाखल करण्यास फर्मावणे. (कलम 79)
22. संस्थेचे दप्तर आणि मिळकतीचा ताबा घेणे (कलम 80).
23. संस्थेने लेखापरिक्षक नियुक्ती न केल्यास पॅनलवरील लेखापरिक्षकाची नियुक्ती करणे (कलम 81) आणि हिशेबातील दोष सुधारण्याचा संस्थेस आदेश देणे. (कलम 82)
24. संस्थेची रचना, कामकाज आणि आर्थिक स्थिती यासंबंधी चौकशी करणे (कलम 83)
25. धनको संघीय संस्थेच्या अर्जावरुन वा स्वत:हून शासकीय रकमांसाठी ऋणको संस्थेची तपासणी घेणे. (कलम 84)
26. चौकशी किंवा तपासणी याचे खर्चाबद्दल हुकूम करणे (कलम 85) आणि ती वसूल करणे (कलम 86)
27. चौकशी अथवा तपासणीत उघडकीस आलेले दोष संस्थेच्या निदर्शनास आणणे आणि त्यासाठी उपाययोजना करण्याविषयी निदेश देणे (कलम 87).
28. अपराधी, प्रवर्तक वगैरे विरुध्द नुकसानी आकारणे (कलम 88)
29. साक्षीसाठी हजर राहणेकरिता किंवा कोणताही दस्तऐवज हजर करण्यास भाग पाडणे.( कलम 89)
30. संस्थेच्या कामकाजाचे निरिक्षण / तपासणी करणे (कलम 89-अ)
31. विवक्षित सहकारी संस्थांच्या देय थकबाकीची रक्कम, जमीन महसूलाची थकबाकी असल्याप्रमाणे वसूलीसाठी दाखला देणे. (कलम 101)
32. सहकारी संस्थेचे व्यवहार गुंडाळण्याचे आदेश करणे. (कलम 102) ऋणपरिशोधकाची नेमणूक करणे. (कलम 103)
33. अवसायनातील संस्थांचे ऋणपरिशोधनासाठी ऋणकोकडून वसुली करणे व धनकोला प्राधान्यक्रमानुसार अदा करणे. (कलम 105)
34. रिझर्व बँक ऑफ इंडीयाचे मंजूरी वा मागणी केल्यावरुन विमा उतरविलेल्या बँकांचे समापन करणे, तिची पुनर्रचना करणे, तिची समिती निष्प्रभावित करणे वगैरे संबंधीत आदेश देणे. (कलम 110अ)
35. सहकारी कृषी आणि ग्रामीण बहुउद्देशिय विकास बँकेचे सदस्यांना दिलेल्या कर्ज रकमांच्या वसुलीसाठी प्रमाणपत्र देणे. (कलम 137)
36. महाराष्ट्र सहकारी संस्था कायदा 1960 चे अंतर्गत नोंदणीकृत संस्थे व्यतिरिक्त इतरांना “सहकारी” या शब्दाचा वापर करण्यास मनाई करणे. (कलम 145)
37. कलम 146 मधील अपराधाबाबत कलम 147 अन्वये न्यायिक चौकशीसाठी प्रकरण चालवण्यास कलम 148(3) नुसार परवानगी देणे.
38. सहकारी संस्थांचे निवडणूकीतील उमेदवारी नामनिर्देशन नामंजुरीबाबत अर्जावरुन अपील ऐकून निकाल देणे. (कलम 152अ)
39. कलम 4,9,11,12,13,14,17,18,19,21,29,35,77A,78,79,88,105 यांचेवरील अपिलांचे अर्ज स्विकारुन निर्णय देणे. (कलम 152)

40. कोणत्याही दुय्यम अधिकाऱ्याने दिलेल्या निर्णयावर पुर्ननिरिक्षण करणे. (सुनावणीचे अधिकार विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था (प्रशासन) वा त्यांचेपेक्षा वरिष्ठ अधिकारी यांना आहेत.) (कलम 154)

41. संस्थेकडून शासनास देय रकमांची वसुली करणे. (कलम 155)

42. मालमत्ता जप्त करुन व तिची विक्री करुन विवक्षित रकमा वसुल करणे. (कलम 156)

43. महाराष्ट्र राज्यातील नोंदणीकृत संस्थेस राज्याबाहेर व राज्याबाहेरील संस्थेस राज्यात शाखा उघडण्यास परवानगी देणे. (कलम 159)

**तळटीप**:- निबंधक व त्यांचे अधिनस्त अधिकारी हे लोकसेवक आहेत. त्यांनी सदभावनापूर्वक केलेल्या कृत्याबद्दल वाद, खटला, कायदेशीर कार्यवाही दाखल करता येणार नाही. (कलम 161, कलम 162)

***

## 3. The procedure followed in the decision making process, including channels of supervision and accountability

**(निर्णय घेण्याच्या प्रक्रियेत अनुसरण्यात येणारी कार्यपध्दती, तसेच पर्यवेक्षण आणि उत्तरदायित्व प्रणाली )**

सहकार खात्याची क्षेत्रीय रचना

**प्रधान सचिव (सहकार) (मंत्रालय स्तर)**

**सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, म. रा. पुणे (राज्यस्तर मुख्यालय)**

**विभागीय सहनिबंधक (विभागस्तर)** | **विभागीय सहनिबंधक (लेखापरिक्षण) (विभागस्तर)**

**जिल्हा उपनिबंधक (जिल्हास्तर)** | **जिल्हा विशेष लेखापरिक्षक (जिल्हास्तर)**

**तालुका / वॉर्ड उप / सहाय्यक निबंधक (तालुकास्तर)** | **तालुका लेखापरिक्षक (तालुकास्तर)**

**4. The norms set by it for the discharge of its functions**

**(स्वत:ची कार्ये पार पाडण्यासाठी ठरविण्यांत आलेली मानके )**

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम 1960 व नियम 1961

**5. The rules, regulations, instructions, manuals and records held by it or under its control or used by its employees for discharging its functions**

**(त्याच्याकडील असलेले किंवा त्याच्या नियंत्रणात असलेले किंवा त्याची कार्ये पार पाडण्यासाठी त्याच्या कर्मचारी वर्गाकडून वापरण्यांत येणारे नियम, विनियम, सूचना, नियमपुस्तिका आणि अभिलेख )**

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम 1960 व नियम 1961

## 6. A statement of the categories of documents that are held by it or under its control

**(त्याच्याकडे असलेल्या किंवा त्याच्या नियंत्रणाखाली असलेल्या दस्तऐवजांच्या प्रवर्गाचे विवरण )**

वर्गीकरण प्रकार A (कायम स्वरूपी ठेवावयाची कागदपत्रे)

- सहकारी संस्थेची नोंदणी व पोट नियम नोंदणी धारिका,
- विभागीय सूचना पुस्तिका (Manual),
- S.O. File (स्थायी आदेश धारिका),
- शासन निर्णय,
- भौगोलिक बदल आदेश,
- कागदपत्रे वर्गीकरण यादी,
- अभिलेख सूची,
- निवाडा व डिक्री आदेश,
- जडवस्तूसंग्रह नोंदवही,
- GIS नोंदवही,
- ग्रेडेशन लिस्ट
- बाजार क्षेत्र जाहीर करणे व शेत माल वस्तूंचे नियमन आदेश
- म. स. सं. नियम 1961 चे नियम 30 अनुसार सर्व कागदपत्रे
- सर्व वैधानिक आदेश
- आर्थिक प्रस्ताव
- नमूनेदार उपविधी
- नोंदणी क्रमांक वितरण

वर्गीकरण प्रकार B (35 वर्षे पर्यंत ठेवावयाची कागदपत्रे)

- लेखापरिक्षण अहवाल,
- पोटनियम दुरूस्ती प्रकरणे,
- कार्यक्रम अंदाजपत्रक पुस्तिका
- पेन्शन प्रकरणे
- जी. डी. सी. ए. निकाल पत्र
- विभागीय परिक्षा निकाल पत्र
- नियुक्ती आदेश
- बदली आदेश
- बढती आदेश
- आरक्षण आदेश

<u>वर्गीकरण प्रकार C (5 वर्षा पर्यंत ठेवावयाची कागदपत्रे)</u>

- सहकारी संस्थांचे वार्षिक अहवाल व लेखे
- शासन राजपत्र व अधिसूचना
- विधान सभा प्रश्न व उत्तरे / विधान परिषद प्रश्न व उत्तरे, कपात सूचना, लक्षवेधी सूचना, आश्वासने
- प्रशासकीय आदेश
- कामकाज वाटप आदेश
- तपासणी अहवाल
- आवक जावक नोंदवही
- PRA / PRB (नियतकालीन विवरण पत्रे सादरीकरण नोंदवही)

**7. <u>The particulars of any arrangement that exists for consultation with, or representation by, the members of the public in relation to the formulation</u> of its policy or administration, thereof**

**<u>(आपले धोरण तयार करण्याच्या किंवा त्याची अंमलबजावणी करण्याच्या संबंधात, लोकांशी विचारविनिमय करण्यासाठी किंवा लोकांकडून निवेदने केली जाण्यासाठी अस्तित्वात असलेल्या व्यवस्थेचा तपशील)</u>**

प्राप्त झालेल्या धोरणात्मक बाबींवर सूचना तसेच कायद्यातील दुरूस्तीबाबतचे प्रस्ताव शासनास मान्यतेसाठी सादर करण्यात येतात. अंतिम मान्यता विधीमंडळाद्वारे होते.

**8. <u>A statement of the boards, councils and other bodies – Minutes</u>**

**<u>( आपला एक भाग म्हणून किंवा सल्ला देण्याच्या प्रयोजनासाठी म्हणून घटीत केलेल्या दोन किंवा अधिक व्यक्तिंच्या मिळून बनलेल्या मंडळांचे, परिषदांचे, समित्यांचे आणि अन्य निकायांचे विवरण आणि त्या मंडळांच्या, परिषदांच्या, समित्यांच्या आणि अन्य निकायांच्या बैठकी लोकांसाठी खुल्या आहेत किंवा कसे किंवा अशा बैठकीची कार्यवृत्ते जनतेला पहावयास मिळण्याजोगी आहेत किंवा कसे याबाबतचे विवरण )</u>**

सुधारित कायद्याप्रमाणे कलम 81 अधिन तरतुदीप्रमाणे सर्व सहकारी संस्था त्यांचे आर्थिक लेख्यांचे प्रतिवर्षी लेखापरिक्षण करवून घेणेसाठी वार्षिक साधारण सभेमध्ये लेखापरिक्षकांच्या नामिकेवरील पात्र लेखापरीक्षकाची नेमणूक करेल. जेथे अशी नेमणूक होणार नाही त्या स्थितीमध्ये संस्थेचा निबंधक परंतुकाचे आदेशाने लेखापरीक्षकाची नेमणूक करुन प्रत्येक संस्थेची लेखापरीक्षा करवून घेईल.

## 9. A directory of officers and employees

(अधिकाऱ्यांची व कर्मचाऱ्यांची निर्देशिका )

**सहकार आयुक्त कार्यालयातील दूरध्वनी क्रमांक**
**कार्यालय PBX-(020)-26122846 फॅक्स नं. 26130360/26133082**

| अधिका-यांचे नाव व पदनाम | कार्यालय | Inter-com |
|---|---|---|
| श्री चंद्रकांत दळवी, सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य | 26122500<br><br>26122739 | 301<br><br>215 |
| श्री. सुनिल पवार, प्र.अपर आयुक्त व विशेष निबंधक, सहकाकरी संस्था | 26129572 | 203 |
| श्री. सुनिल पवार, अपर निबंधक, सहकारी संस्था (वसुली व नियोजन) | 26128979 | 210 |
| श्री.शैलेश कोतमिरे, अपर निबंधक, सहकारी संस्थ(प्रशासन) | 26124306 | 204/205 |
| डॉ.पी.एल.खंडागळे, अपर निबंधक, सहकारी संस्था (तपासणी व निवडणूक) | 26127261 | 209 |
| श्री राजेश जाधवर (प्र.) अपर निबंधक, सहकारी संस्था (लेखापरिक्षण) | 26127217 | 253 |
| श्री प्रशांत सातपुते, उपनिबंधक, सहकारी संस्था (आस्थापना) | 26122846 | 220 |
| श्री एस बी कुलगोड, उपनिबंधक, सहकारी संस्था (परीक्षा व प्रशिक्षण / संवका) | 26122846 | 227 |
| श्री धरणीधर पाटील, उपनिबंधक, सहकारी संस्था (प्रशासन) | 26122846 | 236 |
| श्री डी.एस.साळुंके, उपनिबंधक, सहकारी संस्था (अर्थ-1) | | 218 |
| डॉ. एस. एन. जाधव, उपनिबंधक, सहकारी संस्था (अर्थ-2) | 26122846 | 218 |
| श्री प्रदीप बर्गे, उपनिबंधक, सहकारी संस्था, (नागरी पतसंस्था) | 26122846 | 232 |
| श्री व्ही. पी. पाटील, उपनिबंधक, सहकारी संस्था (गृहनिर्माण / अं व नि) | 26122846 | 260 |
| श्री पांडूरंग खोडका, उपनिबंधक, सहकारी संस्था (दक्षता कक्ष) | 26122846 | 227 |
| श्री प्र. का. जगताप, उपनिबंधक, सहकारी संस्था (निवडणूक, औद्योगिक, मजूर, जंगल कामगार) | 26122846 | 240 |
| श्री एस आर नाईकवाडी, उपनिबंधक, सहकारी संस्था (नागरी बॅंका) | 26122846 | 170 |
| श्री दे.ब.रंधे, सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था (आस्थापना-1) | 26122846 | 221 |
| श्रीमती अरुणा राठोड, सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था (प व प्र.) | 26122846 | 225 |
| श्री आर.एल.गोसावी, सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था (मा.आयुक्त यांचे खाजगी सचिव) | 26122846 | 212 |
| श्री डी. आर. तिजोरे, सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था (संवका) | 26122846 | 235 |
| श्रीमती टी. एच. चव्हाण, सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था (दक्षता) | 26122846 | 225 |
| श्री. एम.ए.परजणे, सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था (गृहनिर्माण) | 26122846 | 241 |
| श्री एस एस तळकेरी, सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था (प्रशासन) | 26122846 | 239 |
| श्री जी टी खामकर, सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था (अं व नि.) | 26122846 | 262 |
| श्री. एम.व्ही. पाटील, सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था (पतसंस्था) | 26122846 | 233 |
| श्री व्ही पी गेडाम, स्वीय सहाय्यक | 26122846 | 214 |
| श्री राजेश जाधवर, सहनिबंधक, सहकारी संस्था (लेप) | 26122846 | 252 |
| श्री पी आर.घोडके,विशेष लेखापरीक्षक, सह.सं.वर्ग-1 | 26122846 | 257 |
| श्री ए.एस.सोनवणे, विशेष लेखापरीक्षक, सह.सं.वर्ग-1 | 26122846 | 257 |

| | | |
|---|---|---|
| श्रीमती एस आर नल्ली, विशेष लेखापरीक्षक, सह.सं.वर्ग-2 | **26122846** | **254** |
| श्रीमती एस आर बडगुजर, विशेष लेखापरीक्षक, सह.सं.वर्ग-2 | **26122846** | **255** |
| श्रीमती गितांजली सुपाते, सहाय्यक संचालक (लेखा) | **26122846** | **242** |
| श्री मंगेश बुटके, लेखाधिकारी | **26122846** | **243** |
| श्री. शशिकांत म्हेत्रे, संख्याशास्त्रज्ञ (सांख्यिकी) | **26122846** | **249** |
| श्री चंद्रशेखर पावसे, सहाय्यक संख्याशास्त्रज्ञ (सांख्यिकी) | **26122846** | **250** |

**10. The monthly remuneration received by each of officers and employees, including the system of compensation as provided in regulations**

**(आपल्या प्रत्येक अधिकाऱ्याला व कर्मचाऱ्याला मिळणारे मासिक वेतन, तसेच प्राधिकरणाच्या विनियमामध्ये तरतूद केल्याप्रमाणे नुकसान भरपाई देण्याची पध्दती )**

| पदनाम | वेतनश्रेणी |
|---|---|
| सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था | संवर्ग पद 37,400/- - 67,000/- |
| अपर आयुक्त व विशेष निबंधक (वित्त) | 37,400/- - 67,000/- अधिक विशेष वेतन |
| अपर निबंधक सहकारी संस्था | 37,400/- - 67,000/- |
| सहनिबंधक सहकारी संस्था | 15,600/- - 39,100/- |
| संख्याशास्त्रज्ञ | 15,600/- - 39,100/- |
| उपनिबंधक सहकारी संस्था | 15,600/- - 39,100/- |
| सहकार आयुक्त यांचे खाजगी सचिव | 15,600/- - 39,100/- |
| विशेष लेखापरीक्षक गट-अ | 15,600/- - 39,100/- |
| सहाय्यक संचालक (लेखा) | 15,600/- - 39,100/- |
| स्वीय सहाय्यक | 15,600/- - 39,100/- |
| लेखाधिकारी | 9,300/- - 34,800/- |
| सहाय्यक सांख्यिकी | 9,300/- - 34,800/- |
| सहाय्यक निबंधक | 9,300/- - 34,800/- |
| विशेष लेखा परिक्षक गट-ब | 9,300/- - 34,800/- |

**11. The budget allocated to each of its agency, indicating the particulars of all plans, proposed expenditures and reports on disbursements made**

**( सर्व योजनांचा तपशील, प्रस्तावित खर्च दर्शविणारा, आपल्या प्रत्येक अभिकरणाला नेमून दिलेला अर्थसंकल्प आणि संवितरित केलेला रकमांचा अहवाल )**

याबाबत, आणि

**12. The manner of execution of subsidy programmes, including amount allocated and the details of beneficiaries of such programmes**

**(अर्थसहाय्य कार्यक्रमाच्या अंमलबजावणीची रित तसेच वाटप केलेल्या रकमा आणि अशा कार्यक्रमांच्या लाभधारकांचा तपशील )**

याबाबत, आणि

**13. Particulars of receipts of concessions, permits or authorisations granted by it**

**(ज्या व्यक्तिंना सवलती, परवाने व प्राधिकारपत्रे दिलेली आहेत अशा व्यक्तिंचा तपशील )**

**सहकार आयुक्त कार्यालयामार्फत राबविण्यात येणा-या योजनांची माहिती**

**1) योजनेचे नाव** : डॉ.पंजाबराव देशमुख व्याज सवलत योजना

**अ) योजना केव्हापासुन कार्यान्वित आहे. :** 1991

**ब) योजनेचा उद्देश व स्वरुप** **:** रु.1,00,000/- पर्यंतचे अल्प मुदतीचे पीक कर्ज घेणाऱ्या आणि विहित मुदतीत परतफेड करणा-या शेतकऱ्यांना 3% वार्षिक दराने व रु.1,00,000/- पेक्षा जास्त पण रु.3.00 लाखापर्यंत अल्प मुदतीचे पीक कर्ज घेणाऱ्या शेतकऱ्यांना 1% वार्षिक दराने व्याजाची सवलत लागू राहील. सदर पीक कर्जाची संपूर्ण

परतफेड प्रतिवर्षी 30 जूनच्या आत करणे आवश्यक आहे.

**क) लाभार्थी** : विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थांचे, राष्ट्रीयीकृत बँकांचे, प्रादेशिक ग्रामीण बँकांचे व खासगी बँकांचे नियमित परतफेड करणारे कर्जदार तसेच या योजनेअंतर्गत, अनुसुचित जाती व नवबौध्द कर्जदार सभासदांना विशेष घटक योजनेअंतर्गत उपरोक्त नमूद केल्याप्रमाणे लाभ देण्यात येतो.

**ड) अर्ज कोणाकडे करावयाचा** : **सहाय्यक** निबंधक/ उपनिबंधक सहकारी संस्था

**इ) मंजूरीचे अधिकार** : **जिल्हा** उपनिबंधक सहकारी संस्था

*******

**2) योजनेचे नाव** : डॉ.पंजाबराव देशमुख व्याज सवलत योजना **विघयो** (जिल्हास्तरीय)

**अ) योजना केव्हापासुन कार्यान्वित आहे.** : **1991**

**ब) योजनेचा उद्देश व स्वरुप** : सर्वसधारण सभासदाप्रमाणे

**क) लाभार्थी** : **अनुसूचित जाती व नवबौध्द कर्जदार सभासद**

विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थांचे, राष्ट्रीयीकृत बँकांचे, प्रादेशिक ग्रामीण बँकांचे व खासगी बँकांचे नियमित परतफेड करणारे कर्जदार तसेच या योजनेअंतर्गत, अनुसुचित जाती व नवबौध्द कर्जदार सभासदांना विशेष घटक योजनेअंतर्गत उपरोक्त नमूद केल्याप्रमाणे लाभ देण्यात येतो.

**ड) अर्ज कोणाकडे करावयाचा** : सहाय्यक निबंधक/ उपनिबंधक सहकारी संस्था

**इ ) मंजूरीचे अधिकार** : जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था

***********

**3) योजनेचे नाव** : राज्यातील शेतकऱ्यांना 6 % व्याज दराने अल्प मुदत पीक कर्ज पुरवठा करणे

**अ) योजना केव्हापासुन कार्यान्वित आहे.** : सन 2006-07 पासुन

**ब) योजनेचा उद्देश व स्वरुप** : राज्यातील शेतकऱ्यांना 6% व्याजदराने अल्पमुदती कर्ज पुरवठा होण्यासाठी जिल्हा

मध्यवर्ती सहकारी बँका, राष्ट्रीयीकृत बँका, खाजगी बँका व प्रादेशिक ग्रामीण बँकांना एक टक्का व्याज परतावा शासनाकडून देण्यात येतो. जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांना 2.50% दराने व्याज परतावा देण्यात येतो. तथापी,: नाबार्डकडून मिळणाऱ्या पुनर्वित्त/कर्जपुरवठयावर व्याज परतावा अनुज्ञेय नाही.

**क) लाभार्थी** : जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका / प्राथमिक कृषी पतसंस्था, राष्ट्रीयकृत बँका व प्रादेशिक ग्रामीण बँका व खाजगी बँका

**ड) अर्ज कोणाकडे करावयाचा** : 1) जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांनी जिल्हा उपनिबंधक यांचेकडे 2) राष्ट्रीयकृत/प्रादेशिक ग्रामीण बँकांनी बँक शाखा ज्या तालुक्यात आहे त्या तालुका सहाय्यक /उपनिबंधक यांचेकडे

**इ ) मंजूरीचे अधिकार** : सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना

*******

**4) योजनेचे नाव** : उपसा जलसिंचन योजनांना अर्थसहाय्य

**अ) योजना केव्हापासुन कार्यान्वित आहे.** : **1994**

**ब) योजनेचा उद्देश व स्वरुप** : सहकारी उपासा सिंचन संस्थामार्फत जास्तीत जास्त जमीन ओलिताखाली आणण्यासाठी उपसा जलसिंचन योजनांना प्रकल्प खर्चाच्या एकुण 25% किंवा रु.100 लाख यापैकी जी रक्कम कमी असेल त्या रकमे इतके शासन सदर संस्थेस अनुदान मंजूर करते राज्यातील सहकारी उपसा जलसिंचन योजनेच्या प्रकल्प खर्चामध्ये गेल्या काही वर्षात सातत्याने वाढ होत आहे व सदर प्रकल्पावर खर्च करणे आर्थिक दृष्टया सभासदांना अडचणीचे झाले आहे. सभासदांवरील खर्चाचा बोजा कमी करुन तो काही प्रमाणात शासनाने उचलण्यासाठी ही योजना कार्यान्वित आहे.

**क) लाभार्थी** : दिनांक 1.4.94 नंतर नोंदलेल्या सहकारी उपसा जलसिंचन संस्था व दि. 1.4.94 रोजी ज्या

सहकारी उपसा जलसिंचन संस्थांची कर्जमागणी प्रकरणे वित्तीय संस्थांकडे प्रलंबित होती व ज्यांनी प्रकल्प उभारणीच्या कामास सुरुवात केली नव्हती अशा संस्था

**ड) अर्ज कोणाकडे करावयाचा** **:** सहाय्यक निबंधक/ उपनिबंधक सहकारी संस्था

**इ) मंजूरीचे अधिकार** **:** राज्य शासन

********

**5) योजनेचे नाव** : सावकारी कर्जमाफी 2015

**अ) योजना केव्हापासुन कार्यान्वित आहे.** **:** 2015 (शा.नि.क्र. एमएलए-1015/ प्र.क्र.25/7-स, दि. 10 एप्रिल 2015 नुसार)

**ब) योजनेचा उद्देश व स्वरुप** **:** विदर्भ व मराठवाडयातील शेतकऱ्यांनी परवानाधारक सावकारांकडून घेतलेल्या कर्जास शासनाने माफी जाहीर केली आहे. यासाठी शासनाने रु. 171.30 कोटीची अर्थसंकल्पीय तरतूद केलेली आहे. या योजनेनुसार पात्र कर्जाच्या मुद्दलाची व व्याजाची शासन भरपाई करणार आहे.

**क) लाभार्थी** **:** लाभार्थी शेतकरी विदर्भ व मराठवाडयातील 7/12 धारक शेतकरी असणे आवश्यक आहे. शेतकऱ्याच्या कुटुंबातील व्यक्तीने परवानाधारक सावकाराकडून कर्ज घेतले असल्यास असेही कर्ज या योजनेस पात्र राहील. परवानाधारक सावकाराकडून कर्ज घेतलेला शेतकरी जर पगारदार व्यक्ती, निवृत्ती वेतन धारक व्यक्ती व मुंबई दुकाने व आस्थापना अधिनियम, 1948 नुसार परवानाधारक व्यक्ती या योजनेला पात्र असणार नाहीत.

**ड) अर्ज कोणाकडे करावयाचा** **:** तालुका उप/ सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था

**इ) मंजूरीचे अधिकार** **:** 1. तालुका स्तरीय समिति

**2.** जिल्हा स्तरीय समिति

********

**6) योजनेचे नाव : प्राथमिक कृषि पतपुरवठा सहकारी संस्थांचे सक्षमीकरण 2015**

**अ) योजना केव्हापासुन कार्यान्वित आहे. :** 2015-16 (शा.नि.क्र. सीसीआर/0313 /प्र.क्र.144/2-स, दि. 6 सप्टेंबर 2014)

**ब) योजनेचा उद्देश व स्वरुप** : राज्यातील अल्पमुदत सहकारी पतसंरचने अंतर्गत (STCCS) प्राथमिक कृषि पतपुरवठा सहकारी संस्थांचे सक्षमीकरण करण्याचा उद्देश आहे. प्राथमिक कृषी पतपुरवठा सहकारी संस्थांना पीक कर्ज वाटपाच्या प्रमाणात अर्थसहाय्य देण्याबाबत शासन निर्णयात नमूद आहे. अर्थसहाय्याची अधिकतम मर्यादा रु. 1.00 लाख प्रति संस्था प्रमाणे आहे.

**क) लाभार्थी** : प्राथमिक कृषि सहकारी पतसंस्था

**ड) अर्ज कोणाकडे करावयाचा** : सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था

**इ) मंजूरीचे अधिकार** : जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था

********

**7) योजनेचे नाव** : औद्योगिक सहकारी संस्थांना भागभांडवली अंशदान

**अ) योजना केव्हापासुन कार्यान्वित आहे. : 1974**

**ब ) योजनेचा उद्देश व स्वरुप** : औद्योगिक संस्थांना आपला आर्थिक पाया मजबुत करण्यासाठी व त्यांच्या अडचणी निवारण्या करिता महाराष्ट्र शासन 1:3 प्रमाणात भागभांडवल देते. औद्योगिक सहकारी संस्थांना वित्तीय संस्थांकडुन आवश्यक प्रमाणात कर्ज उभा रण्याची पात्रता वाढविण्यासाठी ही योजना कार्यान्वीत आहे. सदर योजनेमध्ये प्रकल्प किंमतीच्या 60 % वित्तीय संस्थेचे कर्ज , 10 % संस्थेचे भागभांडवल आणि 30 % शासनाचे भागभांडवल असे आर्थिक सहाय्याचे स्वरुप आहे. सदर योजनेतंर्गत प्रकल्प मर्यादा रु. 5 कोटी इतकी आहे. आणि सदरचे भागभांडवलाची परतफेड 15 वर्षामध्ये करावयाची आहे.

**क) लाभार्थी** : औद्योगिक सहकारी संस्था

**ड ) अर्ज कोणाकडे करावयाचा** : सहाय्यक / उपनिबंधक सहकारी संस्था

**इ ) मंजूरीचे अधिकार** : राज्य शासन

******

**<u>8) योजनेचे नाव</u>** : <u>औद्योगिक सहकारी संस्थांना भागभांडवल अंशदान</u>

**अ) योजना केव्हापासुन कार्यान्वित आहे. : 1972-73**

**ब) योजनेचा उद्देश व स्वरुप** **:** ग्रामीण भागातील बलुतेदारांनी उत्पादीत केलेल्या मालाची विक्री करणे व बलुतेदारांना तांत्रिक / व्यावसायिक सल्ला देणे व मार्गदशन करणे यासाठी बलुतेदारांच्या औद्योगिक सहकारी संस्था तालुका पातळीवर स्थापन करण्यात आलेल्या आहेत. या संस्थांना 1:2 प्रमाणात शासकीय भागभांडवल देण्यात येते. बलुतेदारांच्या सहकारी संस्थांचा भाग भांडवली पाया मजबुत करणे व त्यायोगे बलुतेदारांना स्वयंरोजगारासाठी प्रोत्याहीत करुन त्यांच्या उत्पन्नात वाढ करणे आवश्यक आहे.

**क) लाभार्थी** : बलुतेदार सहकारी संस्था

**ड) अर्ज कोणाकडे करावयाचा :** सहाय्यक निबंधक/ उपनिबंधक सहकारी संस्था

**इ) मंजूरीचे अधिकार** : विभागीय सहनिबंधक,सहकारी संस्था

******

## अंदाज व नियोजन शाखा
## कलम 4 (1) (ब) (V) नमुना ब

| अ. क्र. | शासन निर्णयानुसार दिलेले विषय | शासन निर्णय क्रमांक व तारीख | अभिप्राय ( असल्यास ) |
|---|---|---|---|
| 1 | 2235 सामाजिक सुरक्षा व कल्याण भविष्य निर्वाह निधीच्या वर्गणीदारांसाठी ठेव संलग्न विमा योजनेमध्ये सुधारणा | 1.सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.भनिनि -1003/प्र.क्र 44/2003/13-अ, दिनांक 1.12.2003<br>2. सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक क्र.भनिनि-1012/25प्र.क्र.133/12/13-अ,दिनांक 15.01.2013 | -- |
| 2 | अर्थसंकल्पिय अंदाज सन 2006-07 सहकार पणन व वस्त्रोदयोग विभाग लेखानुदान वितरण (योजना) | 1.अर्थसं-1014 प्र.क्र.166 /2-स दि.19/1/2015<br>2.अर्थसं-1014 प्र.क्र. 167/2-स दि.20/1/2015<br>3.अर्थसं- 0914/प्र.क्र.147/2-स दि.29/1/2015 | |
| 3 | कार्यक्रम अंदाजपत्रक 2015-16 तयार करणे व मुद्रण करण्याबाबत | 1. वित्त विभागचे शासन परिपत्रक क्र.काअंप-2014/प्र.क्र.59/अर्थसंकल्प-1 मुंबई-32 दिनांक 16 ऑक्टोंबर,2014. | प्रतिवर्षी विधानमंडळाच्या मार्चमध्ये होणा-या अर्थसंकल्पीय अधिवेशनास कार्यक्रम अंदाजपत्रके, अर्थसंकल्प विधानमंडळास सादर झाल्यानंतर त्याच दिवशी अथवा दुस-या दिवशी विधानमंडळ सदस्यांना उपलब्ध करुन द्यावयाची असतात. |
| 4 | अर्थसंकल्पीय अंदाज 2015-16 आणि सुधारीत अंदाज 2014-15. | वित्त विभागाचे परिपत्रक क्र.अंदाज-1014/प्र.क्र.48/अर्थसंकल्प-1, दिनांक 20.09.2014. | |
| 5 | माहितीचा अधिकार 2005 | सामान्य प्रशासन विभाग क्र. केंमाअ -2005/प्र. क्र. 230/05/5 दि. 18/8/2005<br>केंद्र शासन राजपत्र दि. 22/12/2005 | |

| | | | |
|---|---|---|---|
| **6** | 7610 शासकीय कर्मचारी इत्यादिंना कर्जे<br>अ) **घरबांधणी अग्रिम** : सुधारित वेतनबँकड मधील वेतन विचारात घेऊन अग्रीमाच्या रकमेत तसेच घराच्या किंमत मर्यादेत सुधारणा करण्याबाबत. | 1) वित्त विभाग, शासन निर्णय क्र.घबांअ.-10.11/प्र.क्र.56/2011/विनियम, दिनांक 27.2.2012.<br>2) सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. भनिनि-1011/प्र.क्र.56/2011/विनियम, दिनांक 1.11.2012 | |
| **7** | **ब) मोटार सायकल, स्कूटर, मोपेड, सायकल** व अपंग राज्य शासकीय कर्मचा-यांसाठी स्वयंचलीत किंवा मनुष्य बळाने चालणारी तीन चाकी सायकल खरेदीसाठी शासकीय कर्मचा-यांना मंजूर करावयाच्या अग्रिमाबाबत. | 1) वित्त विभाग, शासन निर्णय क्र.अग्रिम -2013/प्र.क्र.10/2013/विनियम, दिनांक 20.08.2014. | |
| **8** | क) राजपत्रित राज्य शासकीय अधिका-यांना मोटार कार खरेदी करण्यासाठी अग्रिम मंजूर करण्याबाबत. | 1) वित्त विभाग, शासन निर्णय क्र.अग्रिम 2011/प्र.क्र.57/2011/विनियम, दिनांक 17.02.2012 | |
| **9** | ड )शासकीय अधिकारी/ कर्मचारी यांना वैयक्तिक संगणक /लॅपटॉप /टॅबलेट संगणक खरेदी करण्यासाठी अग्रिम मंजूर करणेबाबत. | 1) वित्त विभाग, शासन निर्णय क्र.अग्रिम 1011/प्र.क्र.50/2011 /विनियम, दिनांक 03.02.2012 | |

**सन 2015-2016 ची अर्थसंकल्पिय तरतुदी बी.डी.एस. वर प्राप्त तरतुदी दर्शविणारे विवरणपत्र**

**(रुपये लाखांत)**

| अ.क्र. | योजनेचे नाव / लेखाशिर्ष | सन 2015-2016 मधील अर्थसंकल्पिय तरतुदी (White Book प्रमाणे) | बी.डी.एस. वर प्राप्त तरतुदी |
|---|---|---|---|
| 1 | (02) (02) राज्य सहकारी संघास अर्थसहाय्य (24250218) | 50.00 | प्राप्त नाही. |
| 2 | डॉ.पंजाबराव देशमुख व्याज सवलत योजना (सर्वसाधारण) (24251009) | 9773.65 | प्राप्त नाही. |
| 3 | डॉ.पंजाबराव देशमुख व्याज सवलत योजना (वि.घ.यो.) (24251213) | 764.83 | प्राप्त नाही. |
| 4 | (05) (02) उपसा जलसिंचन योजनांना अर्थसहाय्य (24251261) | 300.00 | प्राप्त नाही. |
| 5 | (02) (08) ग्रामिण सहकारी पतसंरचनेस वैद्यानाथन समितीच्या अहवालानुसार अर्थसहाय्य (24251537) | 0.00 | प्राप्त नाही. |
| 6 | (01) (10) शेतक-यांना अल्पमुदतीच्या पीक कर्जपुरवठा करण्यासाठी 1 % व्याज दराने अर्थसहाय्य (24251501) | 32500.00 | प्राप्त नाही. |
| 7 | (02)(01) औद्योगिक सहकारी संस्थांना भागभांडवली अंशदान (48510023) | 25.00 | प्राप्त नाही. |
| 8 | (00) (03) अल्पमुदतीच्या कर्जाचे मध्यम मुदतीच्या कर्जात रुपंतर करण्यासाठी अर्थसहाय्य (64250037) | 4000.00 | 11645.47 |
| 9 | (00) (07) राज्यातील अडचणीतील नागरी/ग्रामिण बिगर शेती सहकारी पतसंस्थांना कर्ज (64250692) | 0.00 | प्राप्त नाही. |
| 10 | (00) (01) परवानाधारक सावकाराकडून शेतकऱ्यांनी घेतलेल्या कर्जाची परतफेड (24252444) | 17130.00 | 5000.00 |

**14. Details in respect of the information, available to or held by it, reduced in an electronic form**

( इलेक्ट्रॉनिक स्वरुपात त्यास उपलब्ध असलेल्या किंवा त्याच्याकडे असलेल्या माहितीच्या संबंधातील तपशील )

आणि

**15. The particulars of facilities available to citizens for obtaining information, including the working hours or a library or reading room, if maintained for public use**

(माहिती मिळविण्यासाठी नागरिकांना उपलब्ध असणाऱ्या सुविधांचा तपशील, तसेच सार्वजनिक वापरासाठी चालविण्यांत येत असलेल्या ग्रंथालयाच्या किंवा वाचनालयाच्या कामकाजाच्या वेळांचा तपशील)

या करिता नेमलेले जनमाहिती अधिकारी, आणि

**16. The names, designations and other particulars of the Public Information Officers**

( जनमाहिती अधिकाऱ्यांची नांवे, पदनामे आणि इतर तपशील )

| अ.क्र. | कार्यासनाचे नाव | जन माहिती अधिकारी | प्रथम अपिलीय अधिकारी |
|---|---|---|---|
| 1 | अर्थ | सहाय्यक निबंधक | उपनिबंधक |
| 2 | परीक्षा व प्रशिक्षण | सहाय्यक निबंधक | उपनिबंधक |
| 3 | गृहनिर्माण | सहाय्यक निबंधक | उपनिबंधक |
| 4 | नागरी बँक | मुख्य लिपिक | उपनिबंधक |
| 5 | आस्थापना | सहाय्यक निबंधक<br>सहाय्यक निबंधक | उपनिबंधक |
| 6 | दक्षता | सहाय्यक निबंधक | उपनिबंधक |
| 7 | नागरी पत संस्था | कार्यालय अधिक्षक | उपनिबंधक |
| 8 | औद्योगिक | सहायक निबंधक | उपनिबंधक |
| 9 | मजूर | सहायक निबंधक | उपनिबंधक |
| 10 | निवडणूक | सहायक निबंधक | उपनिबंधक |
| 11 | संघटना व कार्यपध्दती | सहायक निबंधक | उपनिबंधक |
| 12 | अंदाज व नियोजन | सहायक निबंधक | उपनिबंधक |
| 13 | विधि व प्रशासन | सहायक निबंधक | उपनिबंधक |
| 14 | लेखा | लेखाधिकारी | सहाय्यक संचालक |
| 15 | सांख्यिकी | सहाय्यक संख्या शास्त्रज्ञ | संख्याशास्त्रज्ञ |

| अ.क्र. | कार्यासनाचे नाव | जन माहिती अधिकारी | प्रथम अपिलीय अधिकारी |
|---|---|---|---|
| **16** | लेखापरिक्षण | विलेप वर्ग-2(कक्ष-17)<br>विलेप वर्ग-2 (कक्ष-18) | 1) विशेष लेखापरिक्षक वर्ग-1<br>2) विशेष लेखापरिक्षक वर्ग-1 |
| **17** | जंगल कामगार संस्था | सहायक निबंधक | उपनिबंधक |
| **18** | कर्जमाफी कक्ष | वरिष्ठ लिपिक | विशेष लेखापरिक्षक वर्ग-1 |

**17. Such other information as may be prescribed**

( विहीत करण्यांत येईल अशी माहिती )

*******************